# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक – ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/८६७/२०११ **वृत्त प्रसिध्दीसाठी** दि.०४ ऑक्टोबर २०११

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे नवीन महाविद्यालयांच्या प्रक्रियेबाबत समुपदेशन कार्यक्रम संपन्न

## "संस्थाचालकांनी विद्यार्थी हित लक्षात घेऊन प्रस्ताव सादर करावे"

– मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांचे प्रतिपादन

नाशिक (दि.०४) – विद्यापीठाची भूमिका संख्यात्मक स्वरुपाची नसून गुणात्मक स्वरुपाची आहे. यामुळे नवीन प्रस्ताव सादर करतांना सर्व बाबींच्या अटी व नियमांची पूर्तता करणाऱ्या महाविद्यालयांना नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबत परवानगी दिली जाईल अशी माहिती विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी दिली

ते पुढे म्हणाले की, विद्यापीठाने सन २०१२-१३ ते २०१६-१७ कालावधीकरीता नवीन चौथा बृहत आराखडा तयार केला आहे. या बृहत आराखडयाची ठळक वैशिष्टये म्हणजे वैद्यकीय शिक्षणाचे संपूर्ण राज्यामध्ये समन्याय वाटप होण्यासाठी महानगरांमध्ये पाच लाख लोकसंख्येमागे एक वैद्यकीय महाविद्यालय देण्यात येणार असून दुर्गम भागातील महाविद्यालयांना शुल्कामध्ये सवलत दिली जाणार आहे. प्रस्ताव सादर करतांना सर्व बाबींचा विचार करावा. यामध्ये सध्या अस्तित्वात असलेली विविध आरोग्य विज्ञान शाखेच्या महाविद्यालयांत प्रवेश किती होतात, शिक्षक आदींबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. यानंतरच सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन प्रस्ताव सादर करावा असे त्यांनी सांगितले.

या समुपदेशन कार्यक्रमामागील विद्यापीठाची भूमिका मांडतांना विद्यापीठाचे मा.कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता नवीन महाविद्यालये सुरु करणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे, वाढीव प्रवेशक्षमता वाढ या प्रक्रियेबाबत दरवर्षी अर्ज विद्यापीठाकडे येतात, मात्र त्यात मोठया प्रमाणात त्रुटी आढळून येतात. यासाठी या प्रस्तावासोबत कोणकोणत्या कागदपत्रांची

पूर्तता करावी तसेच विद्यापीठाच्या बृहत आराखडयाप्रमाणे नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबत योग्य माहिती मिळण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले.

विद्यापीठाचे उपकुलसचिव श्री. संजय नेरकर यांनी दृकश्राव्य सादरीकरण करुन अधिक माहिती दिली. त्यात प्रामुख्याने प्रस्ताव सादर करतांना लागणारे कागदपत्रे, संलग्नीकरण शुल्क, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क तसेच केंद्र सरकार, केंद्रीय परिषदा, राज्य सरकार आणि विद्यापीठ यांच्या नवीन महाविद्यालये, अभ्यासक्रम, वाढीव प्रवेश क्षमता याबाबत असलेले नियम, जिल्हानिहाय नवीन विविध आरोग्य शाखांची महाविद्यालये सुरु करता येईल याची माहिती, प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत, २०१२-१३ ते २०१६-१७ कालावधीकरीता तयार करण्यात आलेला बृहत आराखडा व त्यातील नवीन समावेश करण्यात आलेल्या बाबी, निकष याबाबत अधिक माहिती दिली. या समुपदेशन कार्यक्रमाचे उपस्थित मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे यांनी केले. या समुपदेशन कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध संस्थाचे ७५ हून अधिक संस्थाचालक व त्यांचे प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते.

कुलसचिव



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे नवीन महाविद्यालयांच्या प्रक्रियेबाबत आयोजित समुपदेशन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर समवेत उपस्थित विविध संस्थाचालक व त्यांचे प्रतिनिधी.